# ***पोलीस- नक्षल चकमकीत दोन जहाल महिला नक्षल्यांना कंठस्नान***

- *दोन दिवसांत तीन नक्षल्यांचा गडचिरोली पोलीसांकडुन खात्मा.*
- *नक्षल चळवळीला जबर हादरा.*

महाराष्ट्र- छत्तीसगड सीमेवर उपविभाग पेंढरी कॅम्प करवाफा अंतर्गत पोस्टे गोडलवाही हद्दीत आज दिनांक ११/०७/२०१७ रोजी गडचिरोली पोलीस दलाचे विशेष अभियान पथक नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना मौजा येनगांव जंगल परिसरात सकाळी ०९.०० वाजेच्या दरम्यान दबा धरुन बसलेल्या अज्ञात नक्षलवादयांनी पोलीस पथकांच्या दिशेने पोलीसांना जिवे मारण्याच्या उद्देशाने अंदाधुंद गोळीबार केला. पोलीसांनी प्रत्युत्तरादाखल स्वसंरक्षणार्थ नक्षलवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. चकमकी दरम्यान २ महिला नक्षलवादयांना ठार करण्यात पोलीसांना यश आले आहे. नक्षलवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहून नक्षलवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

चकमकीनंतर पोलीस पथकांनी घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावर २ महिला नक्षल्यांचे मृतदेह तसेच २ हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात गडचिरोली पोलीसांना यश आले आहे. मिळुन आलेल्या मृत नक्षल्यांची ओळख पटविण्याचे कार्य सुरु असल्याने त्याबाबत सविस्तर माहिती प्रकाशित करण्यात येईल.

याचबरोबर काल दिनांक १०/०७/२०१७ रोजी उपविभाग धानोरा अंतर्गत मौजा रानवाही जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलाचे विशेष अभियान पथक नक्षल विरोधी अभियान राबवित असतांना पोलीस नक्षल चकमक झाली. चकमकीनंतर शोधमोहीम राबविली असता एक जहाल महीला नक्षलीचा मृतदेह व हत्यारासह मोठया प्रमाणात नक्षल साहीत्य जप्त करण्यात पोलीसांना यश आले आहे. काल मिळून आलेल्या नक्षल मृत देहाची ओळख अजून पटली नसून ओळख पटविण्याचे कार्य सुरु आहे.